**नियमित फौ.ख.क्र. ३५३/२०२२** **निशाणी क्र. १८/क लगत**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.०२ यांची जबाणी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | स्वाती दत्ता मिरगे |
| वय | - | ३७ वर्षे |
| व्यवसाय | - | शिलाईकाम |
| राहणार | - | बावणे गल्ली, इचलकरंजी. |

---

**<u>सरतपास मार्फत सहा.सरकारी अभियोक्ता श्री.ए.ए.गोपलकर.</u>**

१. मी आरोपींना ओळखते. आरोपी व मी एका ठिकाणी राहण्यासाठी होतो. दि. ३०/०७/२०२२ रोजी आम्ही बावणे गल्ली येथे राहण्यासाठी होतो त्यावेळी आमच्या घरी राहूल पोळ व त्यांची आई आमचे घरी आली होती. त्या दोघांनी मला व्याजाच्या पैश्यासाठी शिवीगाळ केली. आमची गाडी उचलून नेणार व नव-याला मारणार अशी आरोपीने मला धमकी दिली. घटनेच्या वेळी मी व माझी मुले घरी होतो. माझा मुलगा १५ वर्षाचा आहे व मुलगी ७ वर्षाची आहे.

२. माझे बालाजी पतसंस्था यांचे ५० हजार रूपयांचे कर्ज होते आणि ते भरण्यासाठी मी आरोपीकडून व्याजाने ५० हजार रूपये घेतले होते. ते पैसे मी सन २०२० साली आरोपीकडून घेतले होते. आम्ही महिन्याला ५ हजार रूपयांचा हप्ता, जमेल असे मुद्दल दिले व व्याज राहिले होते. आरोपींनी व्याजासाठी आमचे घरी आले होते. दत्ता मिरगे हे माझे पती आहे. आरोपी आमच्या घरी आले त्यावेळी मी माझ्या पतीला फोन केला होता. माझे पती घरी आले. आरोपीने आम्हाला मारण्याची धमकी दिल्याने आम्ही आरोपीविरोधात पोलीस ठाणेत तक्रार दिली. आता मला दाखविण्यात आलेली तक्रार तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र. १९</u>** देण्यात येते. आरोपी न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपीमार्फत विद्वान विधीज्ञ श्री. एम.के.मुथा.</u>**

३. आरोपी हे व्याजाचे पैसे मागण्यसाठी आमचे घरी आले हा मजकूर मी फिर्याद देते वेळी पोलीसांना सांगीतला होता. सदरचा मजकूर माझे फिर्यादमध्ये का नमुद नाही याचे कारण मला माहिती नाही. आम्ही महिन्याला ५ हजार रूपयांचा हप्ता, जमेल असे मुद्दल दिले व व्याज राहिले होते हा मजकूर मी फिर्याद देते वेळी पोलीसांना सांगीतला होता. सदरचा मजकूर माझे

फिर्यादमध्ये का नमुद नाही याचे कारण मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीची पुर्ण रक्कम आम्ही फेडलेली आहे हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझेकडे नाही. नव-याला मारणार अशी आरोपीने मला धमकी दिली, हा मजकूर मी फिर्याद देते वेळी पोलीसांना सांगीतला होता. सदरचा मजकूर माझे फिर्यादमध्ये का नमुद नाही याचे कारण मला माहिती नाही. घटना आमच्या घरी बावणे गल्ली येथे, सकाळी ९ ते ९.१५ चे दरम्यान घडली.

४. आमचे घरापासून शिवाजीनगर पोलीस ठाणेला चालत गेले तर १० मिनीटे लागतील एवढेच अंतर आहे. माझे पती आल्यानंतर मी पोलीस ठाणेत गेले त्यामुळे फिर्याद दाखल करण्यास उशीर झाला. घटना घडली त्यावेळी मुले घरी होती हा मजकूर पोलीसांना फिर्याद देते वेळी सांगीतला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी राहत असलेले ठिकाण गर्दीचे आहे. असे काही घडले नाही की, तथाकथीत घटनेच्या वेळी मी आरडाओरडा केला व घटनास्थळी आजूबाजूचे लोक जमा झाले.

५. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझे विरूध्द रक्कम वसुल होवून मिळावी म्हणून इचलकरंजी न्यायालयात रे.क.नं.८४/२०२५ चा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे आमच्या बावणे गल्लीतील घरी कधीही आलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून घेतलेली रक्कम देणे लागु नये म्हणून मी आरोपी विरूध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा सांगीतलेला आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

साक्षीदारास त्याची न्यायालयासमक्ष नोंदविलेली साक्ष वाचून दाखविली व त्याने ती त्याच्या सांगण्याप्रमाणे बरोबर नोंदविल्याचे मान्य केले.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण- इचलकरंजी
दिनांक- २४/११/२०२५.

(**डी.बी.साठे**)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. २,
इचलकरंजी.